## राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र. १३३५/२०२१/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्रीम लक्ष्मीबाई संपतराव कदम, पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक. | कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, नाशिक, ता. जि. नाशिक | तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, नाशिक, ता. जि. नाशिक |

सुनावणी दिनांक — २७/१०/२०२३

७. उपस्थिती —

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | उपस्थित | उपस्थित | उपस्थित | उपस्थित |

८. **द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : १८/०५/२०२१

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : अपूर्ण आणि दिशाभूल करणारी माहिती दिली.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती अर्जाप्रमाणे माहिती मिळावी

९. माहिती अर्ज —

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २५/०२/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २५/२/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : १५ दिवस

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती** : पती श्री संपतराव तुकाराम कदम, कृषि पर्यवेक्षक, दिनांक २८/२/२००२ रोजी सेवानिवृत्त झाले त्यानंतर दिनांक २६/८/२०१९ रोजी त्यांचे निधन झाले त्यांचे सेवानिवृत्ती वेतन आणि इतर लाभ यासंदर्भात (१) मा. महालेखापाल मुंबई यांना सेवानिवृत्ती प्रकरण सादर केले किंवा नाही याबाबतचा तपशील (२) सेवानिवृत्ती नंतर निवृत्तीवेतन व इतर लाभ प्रदान केला असल्यास तपशील देणे (३) श्री संपतराव तुकाराम कदम यांच्या सेवापुस्तकाची प्रत देणे (४) सेवानिवृत्ती प्रकरण सादर केले नसल्यास व कोणत्या कारणामुळे प्रकरण सादर केले नाही याबाबतचा तपशील

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : दिनांक ०२/०३/२०२१ च्या पत्रान्वये श्री संपतराव कदम या कार्यालयात कार्यरत असल्याबाबत कोणत्याही प्रकारचे दस्तऐवज आढळून आलेले नाही सबब माहिती निरंक आहे असे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना कळविले आहे.

१०. प्रथम अपील -

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : १९/३/२०२१

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १९/३/२०२१

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती अप्राप्त

(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, नाशिक यांनी सुनावणी घेऊन दिनांक ३०/०३/२०२१ रोजी अपीलार्थी यांच्या प्रथम अपीलावर निर्णय पारित केला आहे. त्यामध्ये कार्यालयात उपलब्ध झालेले दस्तऐवज देण्यात आलेले असून सेवापुस्तक व अन्य दस्तऐवजाचा शोध घेऊन पुरविण्यात येईल असे नमूद करून प्रथम अपील निकाली काढण्यात आलेले आहे.

११. युक्तिवाद/लेखी खुलासा —

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान असे स्पष्ट केले की कार्यालयात उपलब्ध असलेले कागदपत्र पुरविण्यात आलेले असून श्री संपतराव तुकाराम कदम, कृषि पर्यवेक्षक हे अनधिकृतपणे गैरहजर असल्याने त्यांना सेवानिवृत्तीचे लाभ देण्यात आलेले नाहीत.

२) विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय पारित केला होता असे आयोगाच्या निदर्शनास आणून दिले.

३) निष्कर्ष —

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, नाशिक यांनी उपलब्ध महिती विनामूल्य पुरविलेली आहे, तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ३०/०३/२०२१ रोजी निर्णय पारित करून त्यामध्ये सर्व वस्तुस्थिती नमूद केलेली आहे.

सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश**

प्रस्तुतचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. आ- ३२६५ 30 OCT 2024